**मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ कलम ६७ व कलम ६८ मधील कार्यवाही व अधिकार विषद करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
**शासन निर्णय क्रमांक : मुद्रांक-२००७/प्र.क्र.४४/म-१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २३ जुलै २००८

**प्रस्तावना :-**

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ६७ व कलम ६८ मध्ये, चुकविलेल्या मुद्रांक शुल्काचा शोध घेणे संबंधी अधिकार दिलेले आहेत. या अधिकाराप्रमाणे, मुद्रांक जिल्हाधिकारी हे स्वत:, किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यामार्फत, मुद्रांक शुल्क कमी दिले असल्याची शंका असलेल्या ठिकाणास भेट देऊन चुकविलेल्या मुद्रांक शुल्काचा शोध घेऊ शकतात. संबंधित व्यक्तींनी अशा तपासणीचे वेळी नोंदवहया व अभिलेख पुरविणे बंधनकारक आहे. थोडक्यात मुद्रांक विभागातील अधिका-यांना कोणत्याही स्थळास भेट देऊन चुकविलेल्या मुद्रांकाचा शोध घेता येतो. तपासणीमध्ये दस्तास मुद्रांक शुल्क कमी दिले असल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित अभिलेख ताब्यात घेवून त्यावर मुंबई मुद्रांक अधिनियमातील तरतुदी प्रमाणे वसूलीची कार्यवाही करता येते.

महाराष्ट्र राज्यामध्ये मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ६७ व ६८ मध्ये चुकविलेल्या मुद्रांकाचा शोध घेणेबाबतची असलेली तरतुद साधारणपणे आंध्र प्रदेश चे कलम ७३ प्रमाणे आहे. आंध्र प्रदेश राज्यातील कलम ७३ ची तरतुद अवाजवी आहे असा निर्णय आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने दिलाहोता. या निर्णयाविरुध्द आंध्र प्रदेश शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयाकडे अपील दाखल केले होते. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दि.१/११/२००४ रोजी निर्णय दिला असून मा.उच्च न्यायालय, आंध्र प्रदेश यांचा निर्णय कायम केला आहे. सबब सर्वोच्च न्यायालयाचे मत विचारात घेवून महाराष्ट्रातील कलम ६७ व ६८ बाबतीत स्पष्टीकरण जारी करणे आवश्यक आहे यास्तव शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक-२००७/ प्र.क्र.४४/म-१ दिनांक २० मार्च २००७ निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

का. नोंद
संकिर्ण
सर्व ... सभाविल्ह

१) कलम ६७ चे प्रयोजनार्थ, तपासणीसाठी किंवा दस्त अटकाविणेसाठी प्राधिकृत करण्यात येणारी व्यक्ति ही, नोंदणी व मुद्रांक विभागातील राजपत्रित वर्ग-२ चे पद धारण करणा-या अधिका-यापेक्षा कमी दर्जाची नसावी.

२) कलम ६८ चे प्रयोजनार्थ, जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करावयाचा अधिकारी हा नोंदणी व मुद्रांक विभागातील राजपत्रित वर्ग-२ चे पद धारण करणा-या अधिका-यापेक्षा कमी दर्जाचा नसावा.



जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- ...

३) कलम ६७ प्रमाणे तपासणी पूर्वी अथवा कलम ६८ प्रमाणे कोणत्याही स्थळाला भेट देण्यापूर्वी, जिल्हाधिकारी यांनी, संबंधित व्यक्ति अथवा संस्था यांना भेटीचे कारण स्पष्ट करणारी १५ दिवस अगाऊ नोटीस द्यावी लागेल. दरम्यानचे कालावधीत संबंधित व्यक्तिने अथवा संस्थेने स्वतः, संबंधित दस्त हजर केल्यास भेट देण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. अन्यथा कलम ६७ व ६८ खालील अधिकाराचा वापर करुन अभिलेख, विलेख किंवा दस्तऐवज ताब्यात घेऊन आवश्यकता असल्यास अटकाविता येतील.

४) कलम ६७ प्रमाणे किंवा कलम ६८ प्रमाणे तपासणीसाठी किंवा दस्त अटकविणेसाठी संबंधित अधिकारी कार्यालयीन वेळेत संबंधित स्थळाला भेट देईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( द. रा. माळी )**
सह सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त /~~सर्व जिल्हाधिकारी~~ तथा जिल्हा निबंधक
मुद्रांक अधिक्षक, मुंबई / संचालक, नगररचना, पुणे
सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
महालेखापाल (लेखापरीक्षा)महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई/ सर्व सह जिल्हा निबंधक/सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
दुय्यम निबंधक व प्रशासकीय अधिकारी, मुंबई/बांद्रा
सर्व उपजिल्हाधिकारी (मुद्रांक व मुल्यांकन)/ निवासी लेखाधिकारी, मुंबई
शासकीय छायाचित्रण नोंदणी कार्यालय, पुणे/ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
वित्त विभाग (व्यय-१०)/(वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
निवड नस्ती (म-१ कार्यासन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.